**Samana 20.03.20**

# सेवानी खूनप्रकरणी मुख्य आरोपीला माहुलीत अटक

पुणे, दि. १९ (प्रतिनिधी)– चपलांचे व्यापारी चंदन सेवानी यांचे पुण्यातून अपहरण करून खून प्रकरणातील मुख्य आरोपीला पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेच्या युनिट दोनने साताऱ्यातील माहुली गावातील संगमघाट परिसरातून जेरबंद केले. त्याच्याकडून तीन गावठी पिस्तूल आणि ४० काडतुसे असा मोठा शस्त्रसाठा जप्त केला आहे. न्यायालयाने त्याला २५ मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

परवेज हनिफ शेख असे जेरबंद केलेल्याचे नाव आहे. यापूर्वी पोलिसांनी किरण कदम, आफ्रिदी खान, सुनील गायकवाड, प्रीतम आंबरे, अजिंक्य धुमाळ यांना अटक केली आहे.

शेवानी यांचे पुण्यातून दोन कोटी रुपयांच्या खंडणीसाठी अपहरण करून लोणंदजवळ पाडेगाव (ता. खंडाळा) येथील परिसरातील कॅनॉलजवळ पिस्तुलातून गोळ्या झाडून खून केला होता. त्यामध्ये शेख मुख्य सूत्रधार असून, तो सराईत गुन्हेगार आहे. त्याच्यावर १८ पेक्षा अधिक गुन्हे दाखल आहेत. तब्बल २६ तास सापळा रचून पोलिसांनी त्याला जेरबंद केले. सेवानी यांचा खून केल्यापासून शेख पोलिसांना सतत गुंगारा देत होता.

**गुन्हे शाखा युनिट दोनची कामगिरी**

ही कामगिरी पोलीस उपायुक्त बच्चन सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक महेंद्र जगताप, सहायक पोलीस निरीक्षक जयवंत जाधव, पोलीस उपनिरीक्षक प्रताप शेळके, नितीन शिंदे, यशवंत आंब्रे, संजय दळवी, अनिल उसुलकर, यशवंत खंदारे, अतुल गायकवाड, उत्तम तारू, विशाल भिलारे, कादिर शेख, मितेश चोरमोले, गोपाल मदने, अजित फरांदे, विवेक जाधव, दाउद सय्यद, साताऱ्याचे पोलीस कर्मचारी सागर वाघ यांच्या पथकाने केली.




### पोलिसांनी केली मच्छीमाराची वेशभूषा

शेखकडून पिस्तूल खरेदीसाठी बनावट ग्राहक पोलिसांनी पाठविला होता. मात्र, शेख सराईत असल्यामुळे पोलिसांच्या हालचालीवरून त्यांना ओळखत होता. त्यामुळे तो सातत्याने जागा बदलत होता. त्यानंतर माहुली गावानजीक नदीकाठी गुन्हे शाखेच्या कर्मचाऱ्यांनी मच्छीमाराची वेशभूषा केली, त्यावेळी शेख पिस्तूल विक्रीस आला. तरीही त्याची नजर भिरभिरत होती. मात्र, कर्मचाऱ्यांनी केलेली मच्छीमाराची वेशभूषा त्याला ओळखता आली नाही. त्यानंतर बनावट ग्राहकाला शेख पिस्तुलाची विक्री करताना कर्मचाऱ्यांनी त्याच्यावर झडप टाकून अटक केली.

**Pudhari 22.03.20**

# चरस तस्कराच्या गुन्हे शाखेने आवळल्या मुसक्या

## १२ मोबाईलसह रोकड साडेतीन लाखाचा मुद्देमाल जप्त

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

गुन्हे शाखेच्या अमली पदार्थ विरोधी पथकाने चरस तस्कराच्या मुसक्या आवळल्या. यावेळी त्याच्या ताब्यातून ३५ हजार रुपये किंमतीचे १२२ ग्रॅम चरस, दिड लाखाची रोकड, विविध कंपन्याचे पंधरा मोबाईल, एक दुचाकी असा तब्बल ३ लाख ६० हजारांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला. विकास आबा पोंगडवाले (वय. ४२,रा.लक्ष्मीनगर येरवडा) असे अटक केलेल्याचे नाव आहे.

त्याच्या विरुद्ध अमली पदार्थ विरोधी कायद्यानुसार कोरेगाव पार्क पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मोबाईलवर ऑर्डर घेऊन तो लोकांना अमली पदार्थाची विक्री करत असल्याचे पोलिस तपासातून समोर आले आहे. त्यासाठी त्याने त्याच्याकडील मोपेड गाडीत खास कप्पा तयार केला होता.

शुक्रवारी गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक विजय टिकोळे व उपनिरीक्षक सुभाष तागड हे त्यांच्या पथकासह कोरेगाव पार्क पोलिस ठाण्याच्या हद्दीत गस्तीवर होते. त्यावेळी हॉटेल चंद्रमा समोरील रोडवर विकास पोंगडवाले हा संशयास्पदरित्या उभा असलेला दिसून आला. पथकाने त्याला ताब्यात घेऊन पंचासमक्ष त्याची झडती घेतली तेव्हा त्याच्याकडे चरस मिळून आले. ही कामगिरी अपर पोलिस आयुक्त गुन्हे अशोक मोराळे उपायुक्त बच्चन सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक टिकोळे यांच्या पथकाने केली.

विमानतळ पोलिसांनी गांजा बाळगल्याप्रकरणी छितानी प्रसाद मिश्रा (वय ३३) याला अटक केली. त्याच्याविरुद्ध अमली पदार्थ विरोधी कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हद्दीत पेट्रोलिंग करत असताना उपनिरीक्षक पिंगळे यांच्या पथकाल मिश्रा मिळून आला.

**Mata 29.03.20**

# चोरट्याकडून १७ लाखांचा ऐवज जप्त

**पुणे :** घरफोड्या करून चोरलेल्या दागिन्यांवर कर्ज घेणाऱ्या आरोपीला अटक केली आहे. त्याच्याकडून ६४ तोळे आणि कार असा एकूण १७ लाख रुपयांचा ऐवज जप्त केला आहे.

जयंत गोवर्धन गायकवाड उर्फ जयड्या असे चोरट्याचे नाव आहे. समर्थ पोलिस ठाण्याच्या हद्दीतील एखा घरफोडीचा तपास सुरू होता. त्या वेळी पोलिस उपनिरीक्षक प्रभाकर कापुरे यांना सीसीटीव्ही फुटेजमध्ये घरफोडी गायकवाडने केल्याचे दिसून आले. पोलिस कर्मचारी संतोष काळे यांना माहिती मिळाली, की गायकवाड बालेवाडी फाटा येथील ज्युपिटर हॉस्पिटलजवळ येणार आहे. त्यानुसार सापळा रचून त्याला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने रस्ता पेठेत घरफोडी केल्याचे सांगितले. त्यानुसार त्याच्या घरातून २० तोळे दागिने सापडले. तसेच गायकवाडने एक महिन्यापूर्वी राजेंद्रनगर परिसरात घरफोडी केल्याची कबुली दिली. त्यानुसार त्याला अटक करून पोलिसांनी ६४ तोळे सोने, कार असा एकूण १५ लाख ८६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. गायकवाड याने घरफोडी केल्यानंतर चोरलेले दागिने बाणेर येथील मणप्पुरम गोल्ड येथे तारण ठेवून त्याच्या बदल्यात कर्ज काढले होते.

पुणे पोलीस
Pune Police



**Lokmat 22.03.20**

# मारहाण करून लुटणाऱ्यास अटक

## दोन दिवसांची पोलीस कोठडी । पूर्वीही चार जणांना अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** दुचाकी व्यवस्थित चालविण्यास सांगितल्याच्या कारणावरून दोघांना मारहाण करत लुटणाऱ्या आणखी एकास स्वारगेट पोलिसांनी अटक केली. आसिफ जावेद शेख (वय २६, रा. ३८/४, पर्वती दर्शन) असे त्याचे नाव आहे. त्याला दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

प्रकरणात, यापूर्वी चार जणांना अटक करण्यात आली आहे. प्रकरणात किशोर विठ्ठल बालटकर (रा. बिबवेवाडी) यांनी फिर्याद दिली आहे.

ही घटना ७ जुलै २०१७ रोजी मध्यरात्री दीडच्या सुमारास स्वारगेट परिसरात घडली. किशोर हे त्यांच्या मित्रासह स्वारगेट भागात खाण्यासाठी आले होते. यावेळी आरोपी व त्याचे अन्य साथीदार वेडीवाकडी दुचाकी चालवित होते. यादरम्यान, किशोर यांच्या मित्राने गाडी व्यवस्थित चालवा असे सांगितले. त्याकारणावरून आरोपींनी किशोर यांची गाडी अडवित त्यांना व त्याच्या मित्राला मारहाण केली. तसेच, खिशातील रोख रक्कम व मोबाइल चोरून नेल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

याप्रकरणी त्याला अटक करत न्यायालयात हजर करण्यात आले. त्याच्या ताब्यातून गुन्ह्यात चोरी केलेले २६ हजार रुपये जप्त करण्यात आले आहे. गुन्हा दाखल झाल्यापासून तो तीन वर्षे कोठे होता, यादरम्यान त्याने आणखी गुन्हे केले आहेत का, तसेच त्याचे अन्य कोणी साथीदार आहेत का, याचा तपास करायचा असल्याने सहायक सरकारी वकील संजय दीक्षित यांनी आरोपींच्या पोलीस कोठडीची मागणी केली. ती न्यायालयाने मान्य केली.

**Sakal 20.03.20**

# सेवानी खून प्रकरणातील मुख्य सूत्रधारास अटक

**पुणे, ता. १९ :** लक्ष्मी रस्त्यावरील चप्पल व्यापारी चंदन सेवानी यांच्या खून प्रकरणातील मुख्य सूत्रधार परवेझ हनिफ शेख यास पुणे शहर गुन्हे शाखेच्या युनिट दोनच्या पोलिसांनी गुरुवारी अटक केली. त्याच्याकडून गावठी बनावटीचे तीन पिस्टल (गावठी कट्टे), पिस्टलच्या दोन अतिरिक्त मॅगझीन आणि पिस्टलची ४० जिवंत काडतुसे हस्तगत करण्यात आली आहेत.

गेल्या अडीच महिन्यांपासून तो फरार होता. त्याच्यावर खून, जबरी चोरी, दरोडा, घरफोडी, खंडणीसाठी अपहरण करून खून करणे, अग्निशस्त्र सोबत बाळगणे असे एकूण १८ गंभीर गुन्हे दाखल आहेत. हे सगळे गुन्हे सांगली, सातारा भागातील असल्याचे पोलिस निरीक्षक महेंद्र जगताप यांनी सांगितले. शेख याच्या अटकेमुळे या गुन्ह्यातील अटक संशयित आरोपींची संख्या आता सहा झाली आहे.

**Loksatta 15.04.20**

# टाळेबंदीत घरफोडीचा गुन्हा उघड; कर्नाटकातून चोरटा ताब्यात

## व्यावसायिकाच्या घरातून ३१ तोळे दागिने लंपास

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** एका व्यावसायिकाच्या मोटारीवर चालक म्हणून काम करणाऱ्या एकाने भावाच्या मदतीने ३२ तोळे सोन्याचे दागिने लांबविल्याचा प्रकार उघडकीस आल्यानंतर पोलिसांनी या प्रकरणात पसार असलेल्या चालकाला अटक केली. टाळेबंदी लागू झाल्यानंतर पोलिसांनी या प्रकरणाचा तपास करून चोरट्याला कर्नाटकातून ताब्यात घेतले.

या प्रकरणी प्रवीण चंद्रकांत गायकवाड (सध्या रा. किरकिटवाडी, सिंहगड रस्ता, मूळ रा. कलुर्गी, जि. गुलबर्गा, कर्नाटक) याला अटक करण्यात आली.

गायकवाड याचा भाऊ काशिनाथ याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संदीप बधे (रा. कोंढवा) यांनी या संदर्भात कोंढवा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. बधे कुटुंबीय कामानिमित्त तीन महिन्यांपूर्वी बाहेर गेले होते. त्यांच्या घराचा दरवाजा उचकटून चोरट्यांनी कपाटातील ३२ तोळे सोन्याचे दागिने आणि रोकड असा ९ लाख ९६ हजारांचा ऐवज लांबविला होता. पोलिसांनी घटनास्थळी असलेल्या सीसीटीव्ही चित्रीकरणाची पाहणी केली. तेव्हा बधे यांचा मोटारचालक प्रवीण गायकवाड याने चोरी केल्याचे निष्पन्न झाले होते.

गायकवाड पुण्यातून पसार झाल्यानंतर कर्नाटकात वास्तव्यास असल्याची माहिती मिळाली. ६ एप्रिल रोजी कर्नाटक पोलिसांनी गायकवाडला ताब्यात घेतले. त्यानंतर गायकवाडला कोंढवा पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. कोंढवा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक चंद्रकांत गायकवाड, पोलीस निरीक्षक महादेव कुंभार, उपनिरीक्षक संतोष शिंदे, गोमेश कुंभार, इक्बाल शेख, पृथ्वीराज पांडुळे, मोहन मिसाळ, अजिम शेख, उमाकांत स्वामी यांनी गुलबर्ग्याहून गायकवाडला ताब्यात घेतले. त्याच्याकडून सोन्याचे दागिने जप्त करण्यात आले आहेत.

**Mata 04.04.20**

# खूनप्रकरणी आरोपीला दोन तासांत अटक

**हडपसर :** वर्चस्वाच्या वादातून एकाचा खून केल्याप्रकरणी पोलिसांनी दोन तासांत चार आरोपींना अटक केली आहे. या प्रकरणी हडपसर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, चारही आरोपी अल्पवयीन आहेत. गुरुवारी दुपारी गंगानगर येथे ही घटना घडली.

प्रवीण रमेश नाईकनवरे (वय २४ रा. गंगानगर, फुरसुंगी) असे मृत्यू झालेल्या तरुणाचे आहे. त्याचा मित्र प्रसाद राजेंद्र रकल (वय २३, रा. लक्ष्मी कॉलनी, हडपसर) गंभीर जखमी झाला असून, त्याच्यावर सध्या उपचार सुरू आहेत. त्यानेच या प्रकरणी फिर्याद दिली आहे. फुरसुंगी, गंगानगर येथे दोन गटांत झालेल्या भांडणातून चार जणांनी कोयत्याने वार करून दोघांना गंभीर जखमी केल्याची माहिती पोलिसांना कळताच तपास पथकातील कर्मचारी अमित कांबळे यांनी तपासाला सुरुवात केली. घटनेनंतर सर्व आरोपी फरारी झाले होते. आरोपींच्या मित्रांशी संपर्क साधून कांबळे यांनी त्यांना विश्वासात घेतले. या वेळी आरोपी थेऊर येथे लपल्याचे समजले. यानंतर कांबळे यांनी थेऊर येथे जाऊन सर्व आरोपींना जेरबंद केले.

### जुगार खेळणाऱ्यांवर कारवाई

**मंचर :** घोडेगाव पोलिस ठाण्याच्या हद्दीत नारोडीमध्ये जुगार खेळणाऱ्या पाच जणांवर कारवाई करण्यात आल्याचे घोडेगाव पोलिस ठाण्याचे सहायक निरीक्षक प्रदीप पवार यांनी सांगितले. नारोडीत मंदिराजवळ लिंबाच्या झाडाखाली पैसे लावून जुगार खेळला जात असल्याची माहिती पोलिस हवालदार महेश झनकर यांना मिळाली. त्यांनी संबंधित ठिकाणी पाहणी केली असता पाच जण जुगार खेळत होते. त्यातील तिघे जण पोलिसांची चाहूल लागताच पळून गेले. दोघांना ताब्यात घेण्यात आले. पुढील तपास पोलिस हवालदार महेश झनकर करत आहेत.

**Loksatta 22.04.20**

# खंडणी उकळणारा तोतया अधिकारी अटकेत

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** टाळेबंदीत पाषाण भागातील एका किराणा माल दुकानदाराला कारवाई करण्याची धमकी देऊन तसेच ग्राहक मंचातील अधिकारी असल्याच्या बतावणीने खंडणी उकळणाऱ्या तोतयाला गुन्हे शाखेने पकडले.

निशीकांत रामचंद्र धुमाळ (वय ४५, रा. ग्रीन व्हिला सोसायटी, सूस रस्ता, पाषाण) असे अटक करण्यात आलेल्या खंडणीखोराचे नाव आहे. धुमाळने त्याच्या मोटारीवर भारत सरकार ग्राहक मंच अशी पाटी लावली होती. पाषाण-सूस रस्त्यावरील एका किराणा माल विक्री दुकानात शिरून त्याने कारवाई करण्याची धमकी दिली होती. दुकानदाराकडून त्याने वीस हजार रुपयांची खंडणी उकळली होती. त्यानंतर धुमाळ पाषाण परिसरातील एका किराणा माल विक्रीच्या दुकानात गेला. दुकानमालकाला धमकावण्यास सुरुवात केली. तुम्ही चढ्या भावाने मालाची विक्री करत आहात. तुमच्यावर कारवाई करतो, अशी धमकी दिली. त्यानंतर दुकानदाराकडे सव्वालाख रुपयांची खंडणी मागितली. त्यानंतर दुकानदाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दिली.

चौकशीत धुमाळ शासकीय अधिकारी नसल्याचे उघड झाले. त्यानंतर हे प्रकरण तपासासाठी खंडणीविरोधी पथकाकडे सोपविण्यात आले. सापळा लावून धुमाळला पकडण्यात आले. वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र मोहिते, उपनिरीक्षक नीलेशकुमार महाडिक, मगर, महाडिक, गुरव, मंगेश पवार यांनी ही कारवाई केली.

**Mata 12.04.20**

# घरफोडी करणारा सराईत अटकेत

**गुलबर्गा येथे कोंढवा पोलिसांनी ठोकल्या बेड्या**

म. टा. प्रतिनिधी, पुणे

शहर व परिसरात घरफोड्या करणाऱ्या सराईत चोरट्याला कोंढवा पोलिसांनी गुलबर्गा येथे अटक केली आहे. त्याच्याकडून घरफोडीतील तब्बल ३३ तोळे सोने व इतर ऐवज जप्त करण्यात आला आहे. चोरटा तक्रारदार यांच्या वाहनचालकाचा भाऊ असल्याचे समोर आले आहे.

काशिनाथ चंद्रकांत गायकवाड (वय २८, रा. बालुर्गी, ता. अफजलपूर, जि. गुलबर्गा) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. गायकवाड पोलिस रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार असून, त्याच्यावर पुणे शहर व राज्याबाहेर चोरी केल्याचे गुन्हे दाखल आहेत. आरोपी व त्याचा भाऊ प्रवीण गायकवाडने मिळून कोंढवा परिसरातील एका व्यावसायिकाच्या घरात घरफोडी केली होती. त्यानंतर दोघेही फरारी होते. डिसेंबर २०१९मध्ये हा प्रकार घडला होता. या प्रकरणी संदीप बधे (रा. खडी मशिन चौक, कोंढवा) यांनी कोंढवा पोलिस ठाण्यात तक्रार दिली होती. त्यातील काशिनाथला पोलिसांनी अटक केली. तर, प्रवीण अद्याप फरारी आहे.

बधे फ्लॅट बंद करून कुटुंबासह बाहेरगावी गेले होते. त्यानंतर अज्ञात चोरट्याने त्यांच्या घराचा दरवाजा उचकटून ३३ तोळे सोन्याचे दागिने व ४८ हजार रुपये रोख असा एकूण नऊ लाख ७६ हजार रुपये किमतीचा ऐवज चोरला होता.

चोरी तक्रारदार यांच्या वाहनाचा चालक असलेला प्रवीण व त्याचा भाऊ काशिनाथ यांनी केल्याचे तपासात निष्पन्न झाले होते. मात्र, आरोपी सतत पोलिसांना गुंगारा देत होते. ते दोघेही मूळचे गुलबर्गा येथील असल्याची माहिती कोंढवा पोलिसांना मिळाली. त्यानंतर पोलिसांनी स्थानिक ठाण्याला ती माहिती दिली होती. सोमवारी मुख्य आरोपी काशिनाथला गुलबर्गा ग्रामीण पोलिसांनी ताब्यात घेतल्याचे कोंढवा पोलिसांना समजले होते.

**Pudhari 01.05.20**

# तरुणाच्या खुनाचा छडा; दोघांना अटक

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

संगम घाट येथील पार्किंगमध्ये तरुणाच्या खूनप्रकरणी बंडगार्डन पोलिसांनी बारा तासांच्या आत दोघांना अटक केली. निखिल ऊर्फ भय्या दिगंबर कांबळे व प्रदीप ऊर्फ गोट्या गोरख कटारनवरे, (वय २५, रा. दोघेही ताडीवाला रोड) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. त्यांचा अन्य एक साथीदार फरार आहे.

मंगेश विष्णू कांबळे (२९, रा. मंगळवार पेठ) याचा खून चिलीम ओढण्याच्या कारणावरून झाल्याची माहिती तपासात समोर आली.

पोलिसांनी मृतदेहाची ओळख पटविली. मंगेशची आई व भाऊ यांनी सांगितले की, मंगेश नशापाणी करीत असल्याने आमच्याबरोबर राहत नव्हता. तो कोणतेही काम करून कोठेही राहत असे. त्याचे राहण्याचे निश्चित ठिकाण नव्हते. दरम्यान, संगम घाटावर नशापाणी करणारे व फिरस्ते यांच्याकडे पोलिसांनी चौकशी केली असता मंगेशची मंगळवारी घाटावर दोघा-तिघांबरोबर भांडणे झाल्याचे समजले. त्यातील एक व्यक्ती ताडीवाला रोड भागातील नदीकिनारी असल्याची बातमी मिळाली. पोलिसांनी सापळा रचून आरोपींना ताब्यात घेतले. अधिक तपास केला तेव्हा दोघांनी खून केल्याची कबुली दिली. ही कामगिरी पोलिस उपायुक्त शिरीष सरदेशपांडे, सहायक पोलिस आयुक्त रवींद्र रसाळ यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलिस निरीक्षक श्रीकांत शिंदे, गुन्हे निरीक्षक दिगंबर शिंदे, सहायक पोलिस निरीक्षक संदीप जमदाडे, कर्मचारी निखिल जाधव, गौरव डभे, सागर जगताप, अय्याज दड्डीकर, कैलास डुकरे, रूपेश पिसाळ, किरण तळेकर, हरीश मोरे यांच्या पथकाने केली आहे.




## पतीकडून छळ; विवाहितेची आत्महत्या

पतीकडून सतत होणाऱ्या शारीरिक व मानसिक छळास कंटाळून विवाहितेने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. नाझिया रईस खान (वय २०, रा. भवानी पेठ) असे आत्महत्या केलेल्या विवाहितेचे नाव आहे. ही घटना बुधवारी (दि. २९) भवानी पेठ परिसरात घडली. याप्रकरणी खडक पोलिसांनी पती रईस आयुब खान (वय ३४) याला अटक केली आहे. याबाबत नाझियाची आई रेहाना शेख (वय ५९, रा. नेहरूनगर, सांताक्रुज) यांनी तक्रार दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नाझिया व रईस यांचे काही वर्षांपूर्वी लग्न झाले होते. त्यानंतर दोघेही पुण्यात भवानी पेठ परिसरात राहत होते. लग्नानंतर काही दिवसांमध्येच आरोपीने चारित्र्यावर संशय घेत शारीरिक व मानसिक छळ सुरू केला. पुढील तपास सहायक निरीक्षक एस. बी. सावंत करीत आहेत.

## जारमधून हातभट्टीची विक्री; महिला ताब्यात

राहत्या घरी पाण्याच्या जारमधून हातभट्टी दारूची विक्री करणाऱ्या एका महिलेला गुन्हे शाखेच्या सामाजिक सुरक्षा विभागाच्या पथकाने ताब्यात घेतले. ही महिला खंडोबा मंदिराजवळ आंबेगाव येथे संचारबंदीच्या काळात आर्थिक फायद्यासाठी नियमांचे उल्लंघन करून दारूविक्री करीत होती. तिच्या ताब्यातून रोख रक्कम, साहित्य व हातभट्टी दारू असा साडेअकरा हजारांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला. याप्रकरणी संबंधित महिलेवर भारती विद्यापीठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली आहे.

**Pudhari 18.05.20**

# रेल्वे पासच्या बहाण्याने फसवणूक; संशयित महिला पोलिसांच्या जाळ्यात

पुढारी इफेक्ट

पुणे : पुढारी वृत्तसेवा

कोरोना संकटाच्या काळात हातचा रोजगार गेल्यामुळे अनेक मजूर आपले गाव जवळ करीत आहेत. अशातच त्यांच्या हतबलतेचा फायदा घेत पास काढून देण्याच्या बहाण्याने मजुरांकडून पैसे उकळल्याचा प्रकार हडपसर येथील गाडीतळ परिसरात समोर आला आहे. याप्रकरणी हडपसर पोलिसांनी एका महिलेला ताब्यात घेतले आहे. संबंधित महिलेने आतापर्यंत पाच नागरिकांना आर्थिक गंडा घातल्याचे उघडकीस आले असून, आणखी किती जणांची अशा प्रकारे फसवणूक करण्यात आली आहे याचा तपास पोलिस करत आहेत. याबाबत राजेशकुमार शामचरण गौतम (वय ४०, रा. चिंतामणीनगर, हडपसर, मूळ उत्तर प्रदेश) यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार हडपसर पोलिस ठाण्यात महिलेविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी हे मूळचे उत्तर प्रदेशातील भादोही जिल्ह्यातील आहेत. अनेक दिवसांपासून ते हडपसर भागात पानटपरी चालवितात. मात्र लॉकडाऊनमुळे दोन महिन्यांपासून त्यांची पानटपरी बंद आहे. प्रशासनाने रेल्वेतून परप्रांतीयांना त्यांच्या गावी जाण्याची सुविधा सुरू केल्याचे त्यांना माहिती झाले होते. आरोपी महिलेने त्यांना, त्यांची पत्नी व इतरांना तुमचे रेल्वेने जाण्याचे फॉर्म भरून देते व तुमचा पास काढून देते, असे सांगितले. फिर्यादींचा विश्वास संपादन करून त्यांना हडपसर येथील गाडीतळ पुलाखाली २२ मे रोजी बोलावले. या कामासाठी त्यांच्याकडून महिलेने प्रत्येकी एक हजार रुपये घेतले. ठरल्याप्रमाणे फिर्यादींनी महिलेकडे पासची विचारणा केली, मात्र महिलेने उडवाउडवीची उत्तरे दिली. फिर्यादींनी याबाबत चौकशी केली असता, त्यांना कळले की उत्तर प्रदेशला अनेक रेल्वे गेल्या तरी आपल्याला पास मिळाला नाही, तेव्हा फसवणूक झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यानुसार त्यांनी पोलिसात धाव घेत फिर्याद दिली.

## दैनिक पुढारीने लुटीचा प्रकार आणला होता चव्हाट्यावर

मागील आठ दिवसांपूर्वी दैनिक पुढारीने पास काढून देण्याच्या बहाण्याने नागरिकांची फसवणूक होत असल्याचे वृत्त प्रसिद्ध केले होते. शंभर रुपयांत प्रवासाचा पास काढून मिळेल, अशा प्रकारच्या जाहिराती सोशल मीडियावर व्हायरल झाल्याचे दिसून आले होते. त्यानंतर याबाबतचे वृत्त प्रसिद्ध करून नागरिकांना जागरूक राहण्याचे आवाहन केले होते. तसेच प्रवास करण्याकरता लागणारा पास मिळविण्यासाठी कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारले जात नाही, हे देखील स्पष्ट केले होते.

**Lokmat 19.05.20**

**वर्षभरापासून गुंगारा : इतर साथीदार सापडल्यानंतर पोलिसांच्या हाती लागत नव्हता**

# बँकेला गंडा घालणाऱ्या टोळीचा म्होरक्या गजाआड

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : फ्लॅट खरेदीच्या नावाखाली बनावट व्यक्तींना उभे करुन बोगस कागदपत्रांद्वारे कर्ज घेऊन बँकांना लाखो रुपयांचा गंडा घालणाऱ्या टोळीच्या मुख्य सूत्रधाराला डेक्कन पोलिसांनी अटक केली आहे.

राजेश गोपाळ सोंडकर (रा. इंद्रायणीनगर, भोसरी) असे त्याचे नाव आहे. गेल्या एक वर्षापासून तो पोलिसांना गुंगारा देत होता. यापूर्वी पोलिसांनी त्याच्या इतर साथीदारांना अटक केली आहे. डेक्कन पोलीस ठाण्यात सोंडकर विरुद्ध गेल्या वर्षी ३ गुन्हे दाखल आहेत.

याबाबत पोलिसांनी सांगितले की, राजेश सोंडकर याने पंजाब नॅशनल बँक येथे फ्लॅट खरेदीसाठी वेगवेगळ्या व्यक्तींच्या नावावर प्रत्येकी ४० ते ५० लाख रुपयांची तीन गृहकर्ज प्रकरणे केली होती. त्यासाठी त्याने बनावट बिल्डर उभा केला.

बिल्डरच्या नावाने बनावट बँक खाते उघडले. त्यानंतर कर्जाची रक्कम हडप करुन बँकेची आर्थिक फसवणूक केली होती. कर्जाचे हप्ते फेडले जात नसल्याने तपासणी केल्यावर हा सर्व प्रकार उघडकीस आला. पोलिसांनी ज्या व्यक्तींच्या नावे कर्ज प्रकरणे केली होती, त्यांना अटक केली.

मात्र, सोंडकर हा पोलिसांच्या हाती लागत नव्हता. या गुन्ह्याचा तपास करीत असताना सहायक फौजदार हरिचंद्र केंजळे यांना सोंडकर भोसरीत असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार हवालदार धोंडोपंत पांचाळ, राकेश गुजर, संजय शिंदे यांच्या पथकाने भोसरीत छापा टाकून सोंडकर याला ताब्यात घेतले. सोंडकर याच्याविरुद्ध फरासखाना, निगडी, भोसरी, स्वारगेट पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल असल्याची माहिती डेक्कन पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दीपक लगड यांनी दिली.

## पाचव्या मजल्यावरुन पडून मंडप व्यावसायिकाचा मृत्यू




पुणे : नाना पेठेत एसआरए इमारतीतील पाचव्या मजल्यावरुन पडून एकाचा मृत्यू झाला. विजय श्रावण ससाणे (वय ५५, रा. न्यू नाना पेठ) असे त्यांचे नाव आहे. ही घटना सोमवारी दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास घडली. याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार : विजय ससाणे यांचा मंडप डेकोरेशनचा व्यवसाय आहे. लॉकडाऊनमुळे हा व्यवसाय सध्या बंद आहे. ते घरीच होते. दुपारी जेवण केल्यानंतर, ते गॅलरीत फेरफटका मारत होते. या वेळी अचानक ते पाचव्या मजल्यावरुन खाली कोसळले. डोक्याला मार लागल्याने त्यांचा मृत्यू झाला. या घटनेची माहिती मिळाल्यानंतर, समर्थ पोलीस ठाण्याचे पोलीस घटनास्थळी पोहोचले. याबाबत सहायक पोलीस आयुक्त प्रदीप आफळे व वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळकृष्ण कदम यांनी सांगितले की, ससाणे यांचा मंडप डेकोरेशनचा व्यवसाय असून इमारतीवरुन पडल्याने मृत्यू झाल्याचे त्यांच्या नातेवाइकांनी कळविले आहे. गॅलरीतून ते पडले की त्यांनी उडी मारली, हे पहाणारे कोणीही नव्हते. पोलिसांनी अकस्मात मृत्यू अशी नोंद केली आहे. ससाणे, त्यांची पत्नी आणि मुलाची कोविड -१९ ची चाचणी करण्यास सांगण्यात आले आहे.

**Mata 01.05.20**

# तरुणाच्या खुनातील आरोपी ताब्यात

## बंडगार्डन पोलिसांनी अवघ्या काही तासांत लावला शोध

म. टा. प्रतिनिधी, पुणे

संगम घाट येथील पार्किंगमध्ये एका तरुणाच्या डोक्यात वार करून खून केल्याचा गुन्हा काही तासांत उघडकीस आणण्यात पोलिसांना यश आले आहे. या प्रकरणी बंडगार्डन पोलिसांनी दोघांना अटक केली. चिलीम ओढण्यावरून झालेल्या वादातून हा खून केल्याचे समोर आले आहे.

निखिल उर्फ भय्या दिगंबर कांबळे व प्रदीप उर्फ गोट्या गोरख कटारनवरे, (वय २५, रा. दोघेही ताडीवाला रोड) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. त्यांचा अन्य एक साथीदार फरारी असून, पोलिस त्याचा शोध घेत आहेत. या घटनेत मंगेश विष्णू कांबळे (वय २९, रामटेकडी, रा. हडपसर) असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे. या प्रकरणी बंडगार्डन पोलिस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

संगम घाटाजवळ एका तरुणाचा मृतदेह आढळून आला होता. त्याचा खून झाल्याचे कळल्यानंतर दाखल गुन्ह्याच्या अनुषंगाने तपास सुरू होता. आजूबाजूच्या परिसरातील नागरिकांकडे चौकशी करून प्रथम मृतदेहाची ओळख पटवली असता त्याचे नाव मंगेश विष्णू कांबळे (रा. मंगळवार पेठ) असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर मंगेशच्या आई व भाऊ यांच्याकडे अधिक चौकशी केली असता त्यांनी सांगितले, की मंगेश नशापाणी करीत असल्याने आमच्याबरोबर राहत नव्हता. तो कोठेही काम करून कोठेही राहत असे. त्याचा राहण्याचा ठावठिकाणा नव्हता. संगम घाटावर नशापाणी करणारे व फिरस्ते यांच्याकडे पोलिसांनी चौकशी केली असता मंगेशचे मंगळवारी घाटावर दोघा-तिघांबरोबर भांडण झाल्याचे समजले. त्यानुसार तपासाची चक्रे फिरवून पोलिसांनी भांडण झालेल्यांची माहिती काढली. त्यातील एक व्यक्ती ताडीवाला रोड भागातील नदीकिनारी असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून आरोपींना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे अधिक तपास केला. त्यांच्याकडे चौकशी केल्यानंतर मित्रासोबत खून केल्याची कबुली त्यांनी दिली. त्यांचा आणखी एक साथीदार फरारी असून, पोलिस त्याचा शोध घेत आहेत. पोलिस उपायुक्त शिरीष सरदेशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ निरीक्षक श्रीकांत शिंदे, गुन्हे निरीक्षक दिगंबर शिंदे यांच्या पथकाने ही कामगिरी केली.

### असा झाला तपास...

- संगम घाटाजवळ आढळलेला मृतदेह मंगेश कांबळेचा असून, तो नशापाणी करत असे, अशी माहिती पोलिसांना मिळाली.
- त्या अनुषंगाने तपास सुरू केल्यावर संगम घाटावर मंगेशचे मंगळवारी दोघा-तिघांबरोबर भांडण झाल्याचे समजले.
- त्यानुसार पोलिसांनी भांडण झालेल्यांची माहिती मिळवून, ताडीवाला रोड येथून आरोपींना ताब्यात घेतले.
- आरोपींनी मित्रासोबत खून केल्याची कबुली दिली.
- त्यांच्या आणखी एका साथीदाराचा शोध सुरू आहे.




**Lokmat 26.05.20**

# खंडणी मागणाऱ्या चार जणांना केली अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** ईद सणासाठी ५ हजार रुपयांची खंडणी न दिल्याने एका टोळक्याने दोघांना जबर मारहाण केली. त्यांच्या हॉटेलवर जाऊन बाहेर पार्क केलेल्या आलिशान मोटारीची मोडतोड करुन २ लाख रुपयांचे नुकसान केले.

याप्रकरणी येरवडा पोलिसांनी चार जणांना अटक केली असून त्यांच्या तिघा साथीदारांचा शोध सुरु आहे.

सानी गुलामनबी जोड (वय २५, रा. टिंगरेनगर), जिलानी अख्तर जोड (वय २५, रा. सेफ अपार्टमेंट, टिंगरेनगर), ऋतिकसिंग लादड (वय १९, रा. गणेश एन्क्लेव्ह, टिंगरेनगर) आणि निलेश दत्तात्रय घाडगे (वय २६, रा. चौधरी वस्ती,चंदननगर) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत.

याप्रकरणी अतुल रोहिदास गोटे (वय ३२, रा. वडार वस्ती, येरवडा) यांनी येरवडा पोलिसांकडे फिर्याद दिली आहे. ही घटना विमाननगरमधील सोकोरेनगर येथे मध्यरात्री साडेबारा वाजता घडली.

याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गोटे यांच्या मामाचा मुलगा सुयश विटकर याला आरोपींनी मारहाण केली होती. त्याचा जाब विचारण्यासाठी गोटे हे आपल्या मित्राला घेऊन गेले होते. यावेळी आरोपींनी गोटे व त्यांच्या मित्राला धमकावुन ईदसाठी ५ हजार रुपये दे तसेच दरमहा ५ हजार रुपये हप्ता म्हणून खंडणी मागितली. पैसे नाही दिले तर जीवे मारण्याची धमकी देऊन त्यांना लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली.

**Prabhat 20.05.20**

# बँकेला गंडा घालणाऱ्या टोळीचा म्होरक्या जेरबंद




आरोपीने शहरातील पंजाब नॅशनल बँक येथे फ्लॅट खरेदीसाठी वेगवेगळ्या व्यक्तींच्या नावावर प्रत्येकी ४० ते ५० लाख रुपयांची तीन कर्ज प्रकरणे केली. त्यासाठी त्याने बनावट बिल्डर उभा करून बिल्डरच्या नावाने बोगस बँक खाते उघडले. त्यानंतर कर्जाची रक्कम हडप करून बँकेची आर्थिक फसवणूक केली.

याप्रकरणी गुन्हा दाखल होताच पोलिसांनी ज्या व्यक्तींच्या नावे कर्ज प्रकरणे केली, त्यांना अटक केली होती. परंतु, सोंडकर पोलिसांच्या हाती लागला नव्हता. दाखल गुन्ह्याच्या अनुषंगाने तपास करत असताना सहायक फौजदार हरिश्चंद्र केंजळे यांना सोंडकर हा भोसरीत असल्याची माहिती मिळाली.

त्यानुसार वरिष्ठ निरीक्षक दीपक लगड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस हवालदार [illegible] पोंधाळ, राकेश गुरव, संजय शिंदे यांच्या पथकाने छापा टाकून आरोपीला ताब्यात घेतले. त्याच्यावर फरासखाना, निगडी, भोसरी, स्वारगेट पोलीस ठाण्यातही गुन्हे दाखल आहेत, अशी माहिती डेक्कन पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दीपक लगड यांनी दिली.

**Prabhat 30.05.20**

# लुटमार करणाऱ्यांना पोलिसांकडून अटक

पुणे, दि. २९ - कंपनीच्या गेटजवळ तरुणावर कोयत्याने वार करून त्याच्या खिशातील रक्कम चोरणाऱ्या दोघांना मुंढवा पोलिसांनी अटक केली. हडपसर रेल्वे स्टेशनजवळ बुधवारी सायंकाळी हा प्रकार घडला. स्वप्निल भगवंत बंगले (रा. शेवाळेवाडी) आणि मुकेश सुनील साळुंके (रा. हडपसर) असे अटक केलेल्या दोघांची नावे आहेत. त्यांच्याविरोधात विश्वनाथ गुप्ता (रा.मांजरी बुद्रुक) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार मुंढवा पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला.

Pudhari 30.05.20

# पॅरोलवरील आरोपीच्या खून प्रकरणात सहा आरोपींना अटक

## नितीन कसबे खून प्रकरण : एका विधिसंघर्षग्रस्त बालकाचा समावेश

लोकमत न्यूज नेटवर्क

**विमाननगर** : येरवडा कारागृहातून पॅरोलवर सुटलेल्या नितीन कसबे याचा बुधवारी रात्री तीक्ष्ण हत्याराने वार करून निर्घृण खून करण्यात आला होता. या प्रकरणी पोलिसांनी सहा आरोपींना अटक केली असून यात एका विधिसंघर्षग्रस्त बालकाचा समावेश आहे. कुणाल किसन जाधव (वय २०, रा. खराडी), अभिषेक ऊर्फ अभय नारायण पाटील (वय १९, रा. लोहगाव), अक्षय सतीश सोनवणे (वय २०, रा. कामराजनगर येरवडा), आकाश ऊर्फ टक्क्या भगवान मिरे (वय २३, रा. सेवक चौक, येरवडा), अर्जुन दशरथ मस्के (वय १९, रा. लक्ष्मीनगर, येरवडा) यांना अटक करण्यात आली आहे. अटक आरोपी ५ जूनपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. त्यासोबतच गुन्ह्यातील आणखी एका विधिसंघर्षग्रस्त बालकाला ताब्यात घेण्यात आले असून त्याची रवानगी बालसुधारगृहात करण्यात आली आहे. पंचशीलनगर येथे सोमवारी रात्री प्रतीक वन्नाळे या युवकाचा किरकोळ वादातून आठ जणांनी कुऱ्हाड व दगडाने ठेचून खून केला होता. गंभीर घटनेनंतर तिसऱ्याच दिवशी येरवडा येथील नितीन कसबे या पूर्व रेकॉर्डवरील आरोपीचा हल्लेखोरांनी निर्घृण खून केला. तीन दिवसांत झालेल्या दोन खुनांच्या गंभीर गुन्ह्यांमुळे येरवडा व परिसरात खळबळ उडाली आहे. अधिक तपास पोलीस निरीक्षक युनूस शेख करीत आहेत.

- बुधवारी रात्री साडेनऊच्या सुमारास नितीन कसबे याच्यावर १० ते १५ हल्लेखोरांनी तीक्ष्ण हत्याराने वार करुन खून केला होता.
- खुनाचा गंभीर गुन्हा करून सर्व आरोपी फरार झाले होते. गंभीर गुन्ह्यातील सहा आरोपींना येरवडा पोलिसांनी गुरुवारी मध्यरात्रीच्या सुमारास सापळा रचून अटक केली.

Lokmat 01.05.20

# संगम घाटावरील तरुणाच्या खूनप्रकरणी दोघांना अटक

## अवघ्या बारा तासांत यश : फरार एका साथीदाराचा शोध

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : संगमघाट येथील पार्किंगमध्ये झोपलेल्या एका तरुणाच्या डोक्यात वार करून खून करण्याची घटना बुधवारी घडली होती. याप्रकरणी बंडगार्डन पोलिसांनी अवघ्या बारा तासांच्या आत दोघांना अटक केली. तर त्यांचा अन्य एक साथीदार फरार असून, पोलीस त्याचा शोध घेत आहेत.

निखिल ऊर्फ भय्या दिगंबर कांबळे व प्रदीप ऊर्फ गोट्या गोरख कटारनवरे, (वय २५, राहणार दोघेही ताडीवाला रोड) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. मंगेश विष्णू कांबळे (२९,रा.मंगळवार पेठ) असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे. याप्रकरणी बंडगार्डन पोलीस ठाण्यात सुरुवातीला अज्ञात व्यक्तीविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. लॉकडाऊननंतर बंडगार्डन पोलीस ठाण्याच्या हद्दीतील हा दुसरा खून आहे. चिलीम ओढण्याच्या कारणातून झालेल्या वादातून खून झाल्याची माहिती पोलिसांच्या तपासात समोर आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दाखल गुन्ह्याच्या अनुषंगाने तपास करत असताना, आजूबाजूच्या परिसरातील नागरिकांकडे चौकशी करून प्रथम मृतदेहाची ओळख पटवली तेव्हा त्याचे नाव मंगेश विष्णू कांबळे (रा. मंगळवारपेठ) असे असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर मंगेशच्या आई व भाऊ यांच्याकडे अधिक चौकशी केली असता त्यांनी सांगितले की, मंगेश नशापाणी करत असल्याने आमच्याबरोबर राहत नव्हता. तो कोणतेही काम करून कोठेही राहत असे. त्याचा राहण्याचा ठावठिकाणा नव्हता.

### फिरस्त्यांच्या चौकशीनंतर तपासाला वेग

- संगम घाटावर नशापाणी करणारे व फिरस्ते यांच्याकडे पोलिसांनी चौकशी केली असता मंगेशची मंगळवारी घाटावर दोघा-तिघांबरोबर भांडण झाल्याचे समजले. त्यानुसार त्यातील एक व्यक्ती ताडीवाला रोड भागातील नदीकिनारी असल्याची बातमी मिळाली. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून आरोपींना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे अधिक तपास केला, तेव्हा दोघांनी खून केल्याची कबुली दिली. आणखी त्यांचा एक साथीदार फरार असून, पोलीस त्याचा शोध घेत आहेत.
- ही कामगिरी पोलीस उपायुक्त शिरीष सरदेशपांडे, सहायक पोलीस आयुक्त रवींद्र रसाळ यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीकांत शिंदे, गुन्हे निरीक्षक दिगंबर शिंदे, सहायक पोलीस निरीक्षक संदीप जमदाडे, कर्मचारी निखिल जाधव, गौरव उभे, सागर जगताप, अय्याज दड्डीकर, कैलास डुकरे, रुपेश पिसाळ, किरण तळेकर, हरीश मोरे यांच्या पथकाने केली आहे.

**Lokmat 29.06.20**

# फरार गुन्हेगाराला पकडण्यासाठी पोलीस झाले आरोग्य कर्मचारी

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : जबरी चोरीच्या गुन्ह्यातील सराईत गुन्हेगार गेली ८ वर्षे फरार होता. तो घरी असल्याचे समजल्यावर कोंढवा पोलिसांनी महापालिकेचे आरोग्य कर्मचारी असल्याचे सांगत सर्व्हेचा बहाणा करुन त्याच्या घरात प्रवेश मिळविला व त्याला जेरबंद करण्यात यश मिळविले.

योगेश बुद्धीराम माळी (वय ३२, रा. कोंढवा) असे या गुन्हेगाराचे नाव आहे. तो जून २०१३ पासून पोलिसांना गुंगारा देत होता. शेवटी कोरोनाचा संसर्गाचा फायदा घेऊन सर्व्हेच्या नावाखाली त्याला पकडण्यात यश मिळविले. कोंढवा पोलीस ठाण्यातील तपास पथकातील पोलीस नाईक कौस्तुभ जाधव यांना योगेश जाधव हा घरी आला असल्याची माहिती मिळाली होती. त्याने अनेकदा पोलिसांना गुंगारा दिला असल्यामुळे कोंढवा पोलिसांनी काळजी घेतली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक विनायक गायकवाड, महादेव कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा रचला. पोलीस उपनिरीक्षक संतोष शिंदे, सहायक फौजदार इक्बाल शेख, हवालदार योगेश कुंभार, गणेश आगम, दीपक क्षीरसागर, सुशील धिवार, मोहन मिसाळ, उमाकांत स्वामी हे पथक महापालिकेचे आरोग्य कर्मचारी बनले. कोरोनाचा संसर्ग वाढल्याने सर्व्हे करण्याचा बहाणा त्यांनी केला व योगेश याच्या घराबाहेर सापळा लावला. पोलीस उपनिरीक्षक संतोष शिंदे यांनी घरात प्रवेश केला. तेव्हा त्याचे कुटुंबीय घाबरले होते. त्यांची भेदरलेली अवस्था पाहून व आरोपी पूर्वइतिहास लक्षात घेऊन थोडा जरी संशय आला तर तो पळून जाईल हे लक्षात घेऊन शिंदे यांनी आपण महापालिकेकडून आलो आहे. ते रहात असलेल्या परिसरामध्ये व अवतीभोवती कोरोना रुग्ण असल्याची माहिती मिळाल्यामुळे सर्व्हे करीत आहोत, असे सांगून कुटुंबातील लोकांची माहिती विचारली.

**Lokmat 16.06.20**

# नऱ्हेतील हॉटेल व्यावसायिक खूनप्रकरणी तिघे अटकेत

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : नऱ्हे येथील हॉटेल व्यावसायिकाचा भरदिवसा कोयत्याने वार करुन खून केल्याप्रकरणी तिघांना पुणे ग्रामीण पोलिसांच्या दहशतवाद विरोधी पथकाने ताब्यात घेतले.

संतोष रामचंद्र नाक्ती (वय २८, रा. गावडदरा, ता. हवेली), सुधीर राजाराम कामठे (वय २४, रा. कुसगाव, ता. भोर), आकाश नितीन दामगुंडे (वय २७, रा. गौडदरा, ता. भोर) अशा तिघा संशयितांची नावे आहेत.

व्याजाच्या पैशावरुन संतोष याने इतर तिघा साथीदारांच्या मदतीने सुनील लांगोरे (वय ४०) या हॉटेल व्यावसायिकाचा खून केला होता. नऱ्हेमध्ये सुनील याचे हॉटेल आहे. दोन दिवसांपूर्वी हॉटेलच्या बाहेरच चौघांनी त्यांच्यावर कोयत्याने वार करुन त्यांचा खून केला होता. त्यानंतर ते पळून गेले होते. पुणे ग्रामीण पोलीस दलातील दहशतवादविरोधी पथक खेड शिवापूर परिसरात गस्त घालत होते. त्या वेळी त्यांना नऱ्हेमधील हॉटेल व्यावसायिकाचा खून करुन पळालेले दोघे जण कुसगाव येथील शेतात लपले असल्याची माहिती मिळाली. दहशतवादविरोधी पथकाने सापळा रचून संतोष आणि सुधीर यांना पकडले. चौकशीत त्यांनी खुनाची कबुली दिली आहे. त्यानंतर आकाश याला पकडण्यात आले. चौथ्या आरोपीचा शोध घेण्यात येत आहे. ही कामगिरी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पद्माकर घनवट, सिंहगड रोड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक नंदकुमार शेळके, पुणे ग्रामीण दहशतवादविरोधी पथकाचे सहायक निरीक्षक अर्जुन मोहिते, सहायक पोलीस उपनिरीक्षक राजू पवार, विशाल भोरडे, मोहसिन शेख, लक्ष्मण राऊत यांच्या पथकाने केली.

**Lokmat 17.06.20**

# फसवणूक करणारी नायजेरीयन टोळी जेरबंद

## ५ जणांना अटक : हर्बल ऑइलच्या नावाखाली २१ लाखांना घातला होता गंडा

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : हर्बल ऑइल व्यवसायाची ऑफर देऊन महिलेला २१ लाखांचा गंडा घालणाऱ्या नायजेरीन टोळीला सायबर गुन्हे शाखेच्या पथकाने नवी मुंबईतील खारघर येथून जेरबंद केले. त्यांच्याकडून २ लॅपटॉप, बनावट हर्बल ऑइलच्या ५ बाटल्या, १६ मोबाईल, ३० हजार रुपये, डेबिड कार्ड असा ऐवज जप्त केला आहे.

राधा नेल्सन कॅस्टन (वय ३७, रा. हेलन हाऊस, जुहू, मुंबई), अलेक्स इलेचुकवु आरिन्झे (वय ३३), ग्युयेड फ्रान्सिस (वय ३८), ओकोको ओकोरो न्वाआमामा (वय ३८), कालू ईलेचुकवु (वय २७, सर्व रा. खारघर, मुंबई, मूळ नायजेरिया) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत.

या प्रकरणी लोहगाव येथे राहणाऱ्या एका महिलेने फिर्याद दिली होती. या महिलेची टणटण या सोशल संकेतस्थळावर रोज नावाच्या महिलेशी ओळख झाली होती. रोज नाव सांगणाऱ्या महिलेने फिर्यादीशी मैत्री करुन तिचा विश्वास संपादन केला. त्यानंतर तिला जादा नफा कमविण्यासाठी हर्बल ऑइलचा व्यवसाय करण्याची ऑफर दिली. होणाऱ्या नफ्यामधून ४० टक्के नफा तिला देण्याची अट ठेवली. त्यानुसार व्यवसायाच्या नावाखाली वेगवेगळ्या कारणासाठी तिला वेळोवेळी २१ लाख २३ हजार ३२५ रुपये वेगवेगळ्या बँक खात्यात भरायला सांगितले. आपली फसवणूक झाल्याचे या महिलेला लक्षात आल्यावर तिने पोलिसांकडे धाव घेतली.

पोलीस उपायुक्त संभाजी कदम यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक संतोष बर्गे, उपनिरीक्षक अनिल डफळ, पडवळ, पोलीस नाईक दीपिका मोहिते, नितेश शेलार आदिंनी ही कामगिरी केली.

### बनावट हर्बल ऑइल

- सायबर पोलीस या गुन्ह्याचा तपास करीत असतानाच त्यांना एक महिला व्यवसायाच्या अनुषंगाने हर्बल ऑइलचे सॅम्पल बाटली घेऊन मुंबईहून पुण्यात येणार असल्याची माहिती फिर्यादीने पोलिसांना कळविली. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून राधा नेल्सन कॅस्टन हिला पकडले. त्यांच्याकडून एक मोबाईल, २ बनावट हर्बल ऑईलच्या बाटल्या, डेबिट कार्ड जप्त केले. तिच्याकडे केलेल्या चौकशीत तिचे साथीदार खारघर येथे असल्याची माहिती मिळाली. तेथे पोलिसांनी आणखी ४ जणांना पकडले.
- या टोळीने भारतामध्ये अशा प्रकारे आणखी काही जणांना गंडा घातला असल्याची शक्यता आहे. या सर्वांना न्यायालयात हजर केले असता अधिक तपासासाठी २० जूनपर्यंत पोलीस कोठडी मंजूर करण्यात आली आहे.

**Lokmat 04.06.20**

# दोन खुनाच्या गुन्ह्यात २९ आरोपींना अटक

## येरवडा पोलिसांची कामगिरी : दहा संघर्षग्रस्त बालकांचा समावेश

लोकमत न्यूज नेटवर्क

**येरवडा :** येरवडा परिसरात तीन दिवसांत घडलेल्या वेगवेगळ्या दोन युवकांच्या निर्घृण खूनप्रकरणी येरवडा पोलिसांनी तब्बल २९ आरोपींना अटक केली आहे. यामध्ये १० विधिसंघर्षग्रस्त बालक यांचा समावेश आहे. निर्घृण खुनाच्या दोन गंभीर घटनांमुळे येरवडा परिसरात खळबळ निर्माण झाली होती. येरवडा पोलिसांनी गुन्ह्यातील सर्व आरोपींना शिताफीने अटक केली.

पंचशीलनगर येथील प्रतीक वन्नाळे या युवकाचा किरकोळ बादातून २५ मे रोजी रात्री कॉमरजोन येथील मोकळ्या मैदानात डोक्यात कुऱ्हाड घालून निर्घृण खून करण्यात आला होता. या प्रकरणी बच्चू ऊर्फ नवीन वडावराव, आमीन शेख, राहुल भोसले, तय्यब शेख या चार आरोपींना अटक करण्यात आली. तसेच गुन्ह्यातील चार विधी संघर्षग्रस्त बालकांना ताब्यात घेऊन बाल न्यायालयासमोर हजर करण्यात आले होते. त्यांची रवानगी बालसुधारगृहात करण्यात आली आहे. या गुन्ह्यातील अटक आरोपींची न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्यात आलेली आहे. या गंभीर गुन्ह्याचा तपास वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक युनुस शेख करीत आहेत.

### दोन तासांत झाला खून

- लक्ष्मीनगर येरवडा येथील पूर्वरिकॉर्डवरील सराईत गुन्हेगार नितीन कसबे हा तात्पुरता जामिनावर सुटला होता. येरवडा कारागृहातून सुटल्यानंतर अवघ्या दोन तासांत त्याचा सादलबाबा चौकात तीक्ष्ण हत्याराने वार करून येरवड्यातील सराईत गुन्हेगारांच्या टोळीने निर्घृण खून केला होता. या गंभीर गुन्ह्यातील फरार आरोपी आकाश कंचिले, आकाश सपकाळ, ओमकार सोनवणे, चेतन भालेराव, कुणाल जाधव, अभिषेक खोंड, अक्षय सोनवणे, आकाश मिरे, अर्जुन मस्के, राजवीर सावत्रा, नीलेश पुंड, गणेश अडसूळ, लक्ष्मण गजरमल, रिपेंनस चिआप्पा, प्रज्वल कदम अशा पंधरा आरोपींसह सहा विधिसंघर्षग्रस्त बालकांविरुद्ध दाखल गुन्ह्यात अटक करून कारवाई करण्यात आली. येरवड्यात सराईत गुन्हेगारांच्या टोळीयुद्धातून हे गुन्हे घडत असल्याचे यामुळे निदर्शनास आले आहे. लॉकडाऊनकाळात येरवड्याच्या कंटेन्मेंट झोनमध्ये झालेल्या निर्घृण खुनांच्या गंभीर गुन्ह्यांमुळे एकच खळबळ उडाली होती. पोलीस आयुक्तांनी या गंभीर गुन्ह्यातील आरोपींना ताब्यात घेण्याचे आदेश दिले.

**Prabhat 25.06.20**

# नातेवाईकांवर हल्ला करून जंगलात लपलेले आरोपी जेरबंद

**पुणे, दि. २४ -** नातेवाईकांवर हल्ला करून जंगलात लपून बसलेल्या तिघांना कोंढवा पोलिसांनी अटक केली. यासाठी सापळा रचून त्यांना चारही बाजूने घेरावे लागले.

किस्मत चुटक्या शिंदे (२१, येवलेवाडी), कश्यप चुटक्या शिंदे (१९, रा. येवलेवाडी), भारत ऊर्फ मँगो चुटक्या शिंदे (३६, रा. येवलेवाडी) अशी अटक आरोपींची नावे आहेत. संबंधित आरोपी वस्तीमध्ये एकत्र राहतात. त्यांनी त्यांच्या चुलत भावावर भांडणातून वार केले. यानंतर ते जंगलात पळून गेले होते. हा गुन्हा दोन दिवसांपूर्वी घडला. दरम्यान, आरोपींचा शोध घेत असताना पोलीस नाईक कांबळे यांना आरोपी उंड्री येथील जंगलामध्ये लपून बसल्याची माहिती मिळाली. त्यानुसार सहायक पोलीस निरीक्षक चेतन मोरे यांचे एक पथक तयार करून जंगलात पाठवण्यात आले. पोलिसांची चाहूल लागताच आरोपी पळून जात होते. मात्र, पथकाने त्यांना घेरून जेरबंद केले. त्यांच्याकडे चौकशी केली असता, त्यांनी केलेल्या गुन्ह्याची कबुली दिली. संबंधित आरोपी हे शेळ्या-मेंढ्या पाळण्याचा व्यवसाय करतात.

**Loksatta 16.06.20**

# सिंहगड रस्ता भागात चोरटे जेरबंद

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** सिंहगड रस्ता भागातील धायरी परिसरात दरोडा घालण्याच्या तयारीत असलेल्या चोरट्यांच्या टोळीला पोलिसांनी जेरबंद केले. चोरट्यांकडून तीक्ष्ण शस्त्रे, मोबाइल संच, दुचाकी असा ५ लाख ८४ हजारांचा मुदेमाल जप्त करण्यात आला.

रोहित प्रकाश पोकळे (वय २८), शुभम राजेश पवार (वय २५, दोघे रा. गणेश पेठ), अमित धनंजय बोराटे (वय २५, रा. गुरुवार पेठ), भूषण रमेश मोहिते (वय ३७, रा. बेनकर वस्ती, धायरी), संदीप संजय दुबे (वय २५, रा. शुक्रवार पेठ), सागर बाळासाहेब टिळेकर (वय २३), अभिषेक संतोष पन्हाळे (वय २१, रा. गंज पेठ) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. पोलीस नाईक सचिन तनपुरे यांनी यासंदर्भात सिंहगड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. धायरी-नऱ्हे रस्त्यावरील ॲपलॉन्स सोसायटी परिसरात चोरट्यांची टोळी येणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली.

पोलिसांनी तेथे सापळा लावला. दुचाकीवरून आलेल्या सात जणांना पोलिसांनी पकडले.